बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक

**निगमित संप्रेषण व निवेशक संबंध**
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
टेलीफोन -020 :25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तारित क्र. 487

वृत्तपत्रीय निवेदन

# समाजातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत वर्गांसाठी बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे वित्तीय समावेशन शिबिरांचे कार्यक्रम




**पुणे**, **फेब्रुवारी 13**,2022 : देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्य समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील वंचित घटकांना वित्तीय सहाय्य पुरविण्यासाठी वित्तीय समावेशन शिबिरे आयोजित केली होती. मुंबईतील धारावी, कुर्ला, लालबाग, चेंबूर वरळी- कोळीवाडा

व **मुंबई दक्षिण, उत्तर** मुंबई व ठाण्यातील ठिकाणी समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील वंचित घटकांना वित्तीय सहाय्य पुरविण्यासाठी वित्तीय समावेशन शिबिरे आयोजित केली होती.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार, बँकेच्या मुंबई दक्षिण विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री मनोज करे, उत्तर मुंबई विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री रामचंद्र रागरी व ठाणे विभागाच्या विभागीय व्यवस्थापिका श्रीमती नर्मदा सावंत शिबिरांच्या ठिकाणी उपस्थित होते.

पंतप्रधान मुद्रा योजना, पंतप्रधान आवास योजना, पंतप्रधान स्वनिधी योजना, पंतप्रधान जनधन योजना, पंतप्रधान सुरक्षा बिमा योजना, पंतप्रधान जीवन ज्योती बिमा योजना, अटल निवृत्तीवेतन योजना, स्टँड अप इंडिया योजना, स्वयंसहाय्यता महिला बचत गटांसाठी असलेल्या विविध योजना , डिजिटल योजना इत्यादी शासन पुरस्कृत योजनांच्या द्वारे या वित्तीय समावेशन शिबिरांमध्ये अनेक गरीब व गरजू लाभार्थ्यांना जागेवर वित्तीय साहाय्य मंजूर करण्यात आले. पंतप्रधान सुरक्षा बिमा योजना, पंतप्रधान जीवन ज्योती बिमा योजना, अटल निवृत्तीवेतन योजना यामध्ये उर्वरित पात्र प्रौढ व्यक्तींना समाविष्ट करण्याच्या उद्दिष्टाने सध्याच्या सुरु असलेल्या जनसुरक्षा संतृप्ती अभियानाच्या पार्श्वभूमीवर सदर वित्तीय समावेशन शिबिरांचे महत्व व संबंध समुचित आहे. बँक ऑफ महाराष्ट्र सर्वात कमी, म्हणजेच 6.40% दराने गृहकर्ज आणि 6.80% दराने वाहन कर्ज देत असल्याची माहितीही सहभागींना देण्यात आली.

करोनामहासाथीनंतरच्या या कालावधीत इतका देखणा व व्यापक स्वरुपात वित्तीय समावेशन शिबिरे आयोजित केल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी दक्षिण मुंबई, उत्तर मुंबई, व ठाणे या मुंबईतील सर्व विभागीय कार्यालये व तेथील कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

वाढ आणि समृद्धी साध्य करण्यासाठी कर्ज व्यवहाराचा विस्तार करणे हा सर्वात मोठा व महत्वाचा घटक असल्याचे मत व्यक्त करून श्री विजयकुमार यांनी देशातील वित्तीय समावेशन क्षेत्रातील तफावत दूर करण्यासाठी भरपूर वाव असल्याचे व बँक ऑफ महाराष्ट्र ही तफावत दूर करण्यास कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले.

बँकेचे ग्राहक, लोक प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, बिगर शासकीय संस्था, स्थानिक समाज कार्यकर्ते व नेते, व बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी यासह अनेक हितसंबंधी व्यक्ती स्वतः होऊन या देश उभारणीच्या उपक्रमात उत्साहाने सहभागी झाले होते.